# अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ, रत्नागिरी.



**अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरंधनू। इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।**

## सभेची सूचना

मंडळाची **८२** वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. ८ नोव्हेंबर २०१५** रोजी सकाळी १०.३० वाजता मंडळाच्या भगवान श्री परशुराम सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली आहे. तरी आपण या सभेला अगत्यपूर्वक उपस्थित रहावे, अशी नम्र विनंती आहे. सभेच्या ठरलेल्या वेळी जरुर तेवढी गणसंख्या न झाल्यास अर्धा तास थांबून त्याच ठिकाणी सभेस सुरुवात होईल.

## ❊ विषय पत्रिका ❊

१) उपस्थितांचे स्वागत.
   अ) प्रतिमा पूजन. ब) दिवंगतांना श्रध्दांजली. क) प्रास्ताविक.
२) दि. २७ मार्च २०१५ रोजी झालेल्या ८१ व्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
३) दि. १-४-२०१४ ते ३१-३-२०१५ अखेर पूर्ण झालेल्या वर्षाचा अहवाल मंजूर करणे.
४) दि. ३१-३-२०१५ अखेर पूर्ण झालेल्या वर्षाचे जमा खर्च पत्रक वाचून मंजूर करणे.
५) सन २०१५-१६ या वर्षासाठी हिशेब तपासनीस यांची नियुक्ती करणे.
६) सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
७) आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार मा. अध्यक्षांच्या परवानगीने करणे.
८) शांतीपाठ.

**दिनांक : २९ जून २०१५**
**स्थळ : रत्नागिरी.**

**श्री. राजेंद्र विष्णू पटवर्धन**
**कार्यवाह**

## ❊ सूचना ❊

१) वार्षिक अहवाल, अंदाजपत्रक, जमा-खर्च पत्रक इ. विषयी काही माहिती पाहिजे असल्यास व सूचना करणे असल्यास वार्षिक सभेपूर्वी किमान ४ दिवस तरी अगोदर लेखी पाठवाव्यात.

२) जे सभासद बाहेरगावाहून सभेसाठी उपस्थित रहाणार असतील त्यांची निवासाची व भोजनाची व्यवस्था मंडळाचे वतीने करण्यात येणार आहे. अशा सभासदांनी सभेपूर्वी किमान ४ दिवस आधी आपल्या येण्याविषयी कळवावे.

३) ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी कोणतेही विषय मांडावयाचे असतील त्यांनी ते विषय लिखित स्वरुपात सभेच्या तारखेपूर्वी किमान चार दिवस आधी संस्थेच्या कार्यालयात आणून द्यावेत. लिखित स्वरुपात आलेल्या विषयांपैकी कोणते विषय सभेपुढे मांडावयाचे हा अधिकार सर्वस्वी मा. अध्यक्षांचा राहील.

# अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ, रत्नागिरी.



**कै. बाळाजी हरी तथा बळवंतराव मराठे**
आद्य संस्थापक



**कै. ल. वि. केळकर**
वसतिगृह प्रणेते

**करसल्लागार :- सीए. ऋषीकेश फडके,** टिळक आळी, रत्नागिरी.

**लेखापरीक्षक :- फडके चव्हाण गाडगीळ अँड कं.,** टिळक आळी, रत्नागिरी.

## मंडळासाठी निधी संकलन व प्रचार कार्य

खाली नमूद केलेल्या व्यक्ती मंडळाचे वतीने अधिकृत प्रतिनिधी म्हणून निधी संकलनाचे काम आपुलकीने करीत असतात.

१) **श्री. प्रकाश पांडुरंग दामले,** १२, शिवनेरी हाईटस्, मधुकर बी राऊत रोड, बालमोहन शाळेसमोर, दादर, मुंबई नं. २८.दूरध्वनी क्रमांक - ००२-२४४४४६१९, मोबा. ९३२४२६०२०१

२) **श्री. दिलीप गोपाळराव गद्रे,** ४६८, रविवार पेठ, मु. पो. माधवनगर, जि. सांगली.

**कायदा सल्लागार :- ॲड. मुकुंद यशवंत भिडे,** ''सदिच्छा'', परटवणे, रत्नागिरी.

**वैद्यकीय सल्लागार :- डॉ. समिर केशव जोशी,** रत्नागिरी. (फोन - २२११५९)

**: इन्शुअरन्स :**

**दि न्यू इंडिया इन्शुअरन्स कंपनी लि.,** जावकर प्लाझा, जयस्तंभ, रत्नागिरी.


## चित्पावन फाऊंडेशन, मुंबई

**✻ चित्पावन व्यावसायिकांना अर्थसहाय्य व मार्गदर्शन. ✻ विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व सहाय्य.**

**✻ गरजूंना वैद्यकीय उपचारांसाठी व शिक्षणासाठी अर्थसहाय्य. ✻ वृध्दाश्रम प्रकल्प (आनंद घर) उभारणी.**

| श्री. प्रमोदजी लेले | श्री. अमृत फणसे | श्री. संतोष नेने |
|---|---|---|
| ९८२०१८३१२९ | ९८२०९२४६०२ | ९८६७५५५१६५ |

# भावपूर्ण आदरांजली !



कै. ॲड. प्रभाकर अभ्यंकर

रविवार दि. १३ सप्टेंबर २०१५ उजाडला तोच कै. तात्यांच्या दुःखद निधनाच्या वार्तेने. ''देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे घेणाऱ्याने घेता घेता देणाऱ्याचे हात घ्यावे'' या कवीतेची आठवण कै. तात्यासाहेबांच्या अकाली व आकस्मीत मृत्यूने झाली. सन २००३ पासून तात्यासाहेब अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ या संस्थेचे अध्यक्ष होते.

कै. तात्यांनी समाजातील इतर लोकांप्रमाणे ''हलवायाच्या घरावर तुळशीपत्र'' असा सौदा केला नाही तर ''आधी केले मग सांगितले'' हे त्यांनी आपल्या कृतीतून खरे करुन दाखविले. कारण विविध राजकीय नेते किंवा समाजकार्यकर्ते विविध सामाजिक उपक्रम राबवीत असताना त्यांचा त्यामागचा हेतू हा समाजकारण कमी प्रसिध्दी जास्त असा असतो व तोही लोकवर्गणीच्या मिळकतीतून केलेला असतो. परंतु कै. तात्यासाहेब याला अपवाद होते त्यांनी कधीही प्रसिध्दी वा मोठेपणाचा आव आणला नाही. त्यांनी रत्नागिरी शहरातील विविध शैक्षणिक संस्थांना व तालुक्यातील विविध शाळांना उदार व सढळ हस्ते देणगी दिलेली आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य केलेले आहे. तसेच धामणसे येथील ग्रंथालयाला आपल्या प. पू. मातोश्रींच्या स्मृती प्रित्यर्थ ग्रामीण भागातील रुग्णांसाठी रुग्णवाहीका दिलेली आहे.

''बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले'' याचा प्रत्यय व प्रचिती त्यांच्या कृतीतून वारंवार दिसून येत असे. याचे बोलके उदाहरण म्हणजे निवळी एम. आय. डी. सी. विरोधात त्यांनी दिलेल्या एकहाती संघर्षाच्या आठवणी ''याची देही याची डोळा'' बघितलेले कित्येकजण आजही सांगतात. त्यांचा संघर्षातील सहभाग स्वार्थासाठी वा प्रसिध्दीसाठी नव्हता तर तन, मन व धन समर्पित करुन ते अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहिले व त्यांच्या न्याय्य हक्कासाठी पोट तिडकीने लढले व गरजू शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात यशस्वी ठरले. या गोष्टींमुळे त्यांच्यातील नेतृत्व गुणाचा कस लागला व सामान्य शेतकऱ्यांनी त्यांच्यावर दाखविलेला विश्वास त्यांनी सार्थ ठरविला.

एक यशस्वी व नामांकीत आंबा व्यावसायीक म्हणून त्यांचा सर्व दूर नावलौकिक होता कारण ४० वर्षाचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या गाठीशी होता. आंबा व्यवसायाबाबतचे भाकीत वा त्यांनी वर्तविलेले भविष्य कधीही चुकले नाही. समस्त रत्नागिरी वासीयांचे श्रध्दास्थान असलेल्या श्रीदेवी भगवतीवर त्यांची अपार श्रध्दा व निष्ठा होती. गेली सुमारे ३० ते ३२ वर्षे दरवर्षी नवरात्र उत्सवात ते नियमितपणे श्रीदेवी भगवतीच्या दर्शनाला पायी चालत जात असत व या उपक्रमात कधीही खंड पडल्याचे ऐकीवात नाही.

विविध राजकीय पक्षांच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी, सामाजिक व शैक्षणिक संस्थांच्या प्रमुखांनी त्यांना कै. तात्यांचे बाबतीत आलेले अनुभव सांगून काढलेल्या गौरवोद्गाराने कै. तात्यांच्या असामान्य व्यक्तिमत्वाची व त्यांच्यामध्ये उपजत असलेल्या विविध पैलूंची ओळख श्रध्दांजली सभेमधील उपस्थितांना झाली. ''स्वतःसाठी जगला तो मेला व दुसऱ्यासाठी मेला तो जगला'' अशा उत्तुंग व्यक्तीमत्वाच्या व दातृत्वाच्या महामेरुला म्हणजेच कै. तात्यासाहेबांच्या पवित्र आत्म्याला सद्गती लाभो ही सर्वांच्या वतीने ईश्वरचरणी प्रार्थना !

# ❊ मनोगत ❊

प्रति,
मा. सभासद, हितचिंतक व देणगीदार,
अ. चि. ब्रा. वि. स. मंडळ, रत्नागिरी

यांसी सप्रेम नमस्कार

आपणाला आपल्या मंडळाचा ८२ वा वार्षिक अहवाल मंडळाचा कार्यवाह या नात्याने सादर करीत आहे. आपल्या मंडळाने गेली पाच वर्षे अहवालाच्या मुखपृष्ठावर श्रीदेव परशुराम याबरोबरच लोकोत्तर चित्पावनांचा परिचय करुन देणारे अहवालाचे मुखपृष्ठ छापण्याची परंपरा कायम ठेवून यावर्षीच्या अहवालाच्या मुखपृष्ठावर भारतरत्न महर्षि धोंडो केशव कर्वे यांचे चित्र छापले आहे.

आपल्या मंडळाचा कारभार लोकाभिमुख करण्यामध्ये मंडळाच्या विद्यमान कार्यकारिणींचे, आपल्यासारख्या सर्व सुजाण सभासदांचे व मंडळाच्या पारदर्शक कारभाराने प्रेरित होवून उदार हस्ते देणगी देणाऱ्या हितचिंतकांचे खुप मोठे योगदान आहे व मंडळाची दरवर्षी सातत्याने होणारी भरभराट व नेत्रदिपक प्रगती ही त्याची पोच पावती आहे.

ज्ञातीतील होतकरु व गरजू विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य करण्याबरोबरच ब्राह्मण ज्ञातीतील विद्यार्थ्यांसाठी नाममात्र मोबदल्यात निवासाची उत्तम व्यवस्था, किर्तनाद्वारे रसिक श्रोत्यांसाठी समाज प्रबोधन, पूर्व माध्यमिक व माध्यमिक शालांत शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या गुणवंतांना वाचन संस्कृतीची चळवळ जोपासण्यासाठी दर्जेदार लिखित साहित्याचे वाटप. लोकोत्तर चित्पावनांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या, विविध समाजोपयोगी व लोकोपयोगी व्याख्याने व करमणुकीच्या दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन मंडळातर्फे वारंवार केले जाते.

८१ व्या अहवालामध्ये आपणास मंडळाच्या विविध लोकोपयोगी उपक्रमांबरोबरच वैद्यकीय अर्थसहाय्य करण्याचा मानस आहे. असे आवाहन करण्यात आले होते. त्यासाठी बहुमोल अर्थसहाय्याची गरज आहे. सदरहू निधी जसजसा जमा होईल त्या अनुषंगाने सदर उपक्रमाची अंमलबजावणी टप्याटप्याने करण्यात येईल.

आपण सर्व मंडळाचे जाणकार, अभ्यासू व मंडळावर निस्सिम प्रेम करणारे सभासद आहात तरी सर्वांना आवाहन करण्यात येते की, मंडळाच्या सर्व समाजोपयोगी व लोकोपयोगी उपक्रमांमध्ये देणगीच्या माध्यमातून व उपस्थितीच्या माध्यमातून सहभागी होवून मंडळाची कारकिर्द, वाटचाल व प्रगती सुजलाम सुफलाम करण्यासाठी सहकाराचे ब्रिद वाक्य ''एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ'' हे प्रत्यक्षात आणण्यासाठी सहकार्य करण्याची प्रतिज्ञा करुया.

आपला मंडळावर असलेला निस्सिम लोभ असाच कायम राहून तो उत्तरोत्तर अधिक दृढ व वृध्दींगत व्हावा ही विनंती व आपणही मंडळाच्या वेगाने होणाऱ्या प्रगतीचे साक्षीदार होवूया.

आपला,

**राजेंद्र पटवर्धन** (कार्यवाह), अ. चि. ब्रा. वि. स. मंडळ, रत्नागिरी.

## ❊ उल्लेखनीय देणगी ❊

चालू आर्थिक वर्ष सन २०१५-१६ मध्ये पुणेस्थित मंडळ सभासद, ज्योतिषशास्त्री व ज्येष्ठ उद्योजक श्री. विश्वास विनायक बापट यांनी आपल्या मंडळाला रक्कम रु. १०,६०,०००/- चे भरघोस अर्थसहाय्य केले त्याबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे.

# वार्षिक सभेचा वृत्तांत

मंडळाची ८१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. २७ मार्च २०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता मंडळाच्या भगवान श्री परशुराम सभागृहात संपन्न झाली. भगवान श्री परशुराम व श्री गणेश यांच्या प्रतिमांसह कै. बा. ह. मराठे व कै. ल. वि. केळकर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन झाले. त्यानंतर कार्यवाह श्री. राजेंद्र पटवर्धन यांनी अहवाल वर्षात दिवंगत झालेले सदस्य, हितचिंतक व देणगीदार यांची नांवे वाचून दाखविली. त्यानंतर उपस्थित सर्वांनी उभे राहून दिवंगतांना श्रध्दांजली वाहीली. त्यानंतर मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. श्रीनिवास जोशी यांनी आपल्या प्रास्तावीकपर भाषणात अहवाल वर्षात झालेल्या विविध कार्यक्रमांचा आढावा घेतला. तसेच विद्यार्थ्यांना दिलेल्या शिष्यवृत्तीचीही माहिती दिली. त्यानंतर सभेचे कामकाज झाले. त्यामध्ये अहवालात दिल्याप्रमाणे घटना दुरुस्ती मंजूर झाली. शेवटी मंडळाचे अध्यक्ष ॲड. प्रभाकर अभ्यंकर यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यांनी उपस्थितांना मंडळाला सहकार्य करण्याचे आवाहन करुन आपले भाषण संपविले. त्यानंतर सर्वांचे आभार व शांतीपाठ होऊन सभेचे कामकाज संपले. शेवटी सामुहीक भोजन झाले.

## * मंडळाचे उपक्रम *

### श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पुण्यतिथी साजरी

सोमवार दि. २८ एप्रिल २०१४ रोजी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पुण्यतिथी निमित्त पेशव्यांच्या मंडळातील प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

### भगवान श्री परशुराम जयंती

सालाबादप्रमाणे गुरुवार दि. १ मे २०१४ रोजी भगवान श्री परशुराम जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकारीणी सदस्य व हितचिंतक उपस्थित होते.

### मंडळातर्फे वीर सावरकर जयंती साजरी

बुधवार दि. २८ मे २०१४ रोजी वीर सावरकर जयंतीनिमित्त मंडळातर्फे लक्ष्मीचौक येथील वीर सावरकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकारीणी सदस्य व बहूसंख्य सावरकर प्रेमी उपस्थित होते.

### आर्थिक दुर्बल ज्ञाती बांधवांना अर्थसहाय्य

चिंचखरी, सोमेश्वरस्थित मतिमंद मुलाचे वयोवृध्द पालक श्री. वामन बळवंत गोडबोले यांना रक्कम रु. २३,०००/- चे अर्थसहाय्य मंगळवार दि. १० जून २०१४ रोजी मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष लाभार्थींच्या घरी भेट देवून करण्यात आले.

### लो. टिळक जयंती साजरी

बुधवार दि. २३ जुलै २०१४ रोजी लो. टिळक जयंती निमित्त मंडळातर्फे टिळक आळीतील टिळकांच्या जन्मभूमीमधील लो. टिळकांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पूष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकारीणी सदस्य उपस्थित होते.

## नगराध्यक्ष भेट

रत्नागिरी नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष श्री. महेंद्र मयेकर यांची सदिच्छा भेट शुक्रवार दि. २५ जुलै २०१४ रोजी मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांनी त्यांच्या दालनामध्ये घेतली.

## किर्तन सप्ताह

मंडळातर्फे धार्मिक व पवित्र अशा श्रावण महिन्याचे औचित्य साधून रविवार दि. २७ जुलै २०१४ ते शनिवार दि. २ ऑगस्ट २०१४ पर्यंत रोज सायंकाळी ४-३० ते ६-३० या वेळात किर्तन सप्ताहाचे आयोजन केले होते. सदर सप्ताहात पुढील प्रमाणे किर्तने झाली. किर्तनाला रोज १५० ते २०० श्रोत्यांची उपस्थिती असे.

| क्र. | दिनांक | किर्तनकार | आख्यान विषय |
|---|---|---|---|
| १) | २७-७-२०१४ | ह. भ. प. कु. किरण कुलकर्णी, पुणे | पंडित त्यागराज |
| २) | २८-७-२०१४ | ह. भ. प. श्री. रामचंद्र भिडे, पुणे | बिल्व मंगल |
| ३) | २९-७-२०१४ | ह. भ. प. सौ. अस्मिता देशपांडे शिरवळकर (डोंबिवली) | बाळाजी आवजी |
| ४) | ३०-७-२०१४ | ह. भ. प. सौ. सुरेखा मुकुंद जोशी, रत्नागिरी | शिवभक्त शबर |
| ५) | ३१-७-२०१४ | ह. भ. प. कु. कैलास यशवंत खरे, रत्नागिरी | गोरक्षनाथ |
| ६) | १-८-२०१४ | ह. भ. प. श्री. सुमंत यशवंत भिडे, गुहागर | संत लाखा कोलाटी |
| ७) | २-८-२०१४ | ह. भ. प. श्री. चिंतामणी निमकर, पुणे | समर्थ रामदास स्वामी |

## लो. टिळक पुण्यतिथी साजरी

शुक्रवार दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी टिळक पुण्यतिथी निमित्त मंडळातर्फे टिळक आळीतील टिळक जन्मभूमी मधील लो. टिळकांच्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व टिळक प्रेमी उपस्थित होते.

## गुणगौरव सोहळा

रविवार दि. २४ ऑगस्ट २०१४ रोजी मंडळातर्फे रत्नागिरी शहरातील शाळातून पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये सूयश मिळविणाऱ्या ५० ब्राह्मण विद्यार्थ्यांना निमंत्रीत करण्यात आले होते. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांना बाबासाहेब पुरंदरे लिखीत 'शेलार खींड' हे पुस्तक व कथाकथनाच्या सात कथांची सिडी याचे वाटप करण्यात आले तर माध्यमिक शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांना बाबासाहेब पुरंदरे लिखीत 'राजा शिवछत्रपती'' या पुस्तकाच्या पूर्वाध व उत्तरार्धाचे वाटप करण्यात आले, तसेच १० वी एस. एस. सी. परीक्षेत कोकण बोर्डात ९९.२०% गुण मिळवून प्रथम आलेली कु. चिन्मयी विजय मटांगे, पटवर्धन हायस्कूल रत्नागिरी हिचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कै. राजेंद्र माने अभियांत्रीकी महाविद्यालय आंबवचे अधिष्ठाता प्रा. डॉ. महेशजी भागवत, देवरुख यांना निमंत्रीत करण्यात आले होते. नुकतीच त्यांची प्राचार्य पदावर नेमणूक झाली आहे.

## वसतीगृह विद्यार्थी व पालक सभा

रविवार दि. ५ ऑक्टोबर २०१४ रोजी मंडळाच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा मंडळाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी सर्व विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. सभेमध्ये वसतीगृहातील सोयींबाबत विचार विनिमय करण्यात येवून सर्व बाबींवर साधक-बाधक चर्चा होवून विद्यार्थ्यांच्या पालकांनी समाधान व्यक्त केले.

## निरीक्षणगृह-बालसुधारगृहाला अर्थसहाय्य

रविवार दि. २ नोव्हेंबर २०१४ रोजी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना, रत्नागिरी या संस्थेला भेट देवून रक्कम रु. १२,५००/- चे अर्थ सहाय्य केले. यामध्ये कु. सुचित सुरेश बाईत या विद्यार्थ्याचे एक वर्षासाठी पालकत्व स्विकारले. हा मुलगा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी या संस्थेत शिक्षण घेत आहे. रु. २,५००/- एक दिवसाच्या मुलांचे मिष्टान्न भोजनासाठी देण्यात आले.

## आरोग्य शिबीराचे आयोजन

पतंजलि योग समिती जिल्हा रत्नागिरी व मंडळाचे संयुक्त विद्यमाने रविवार दि. ४ जानेवारी २०१५ ते शनिवार दि. १० जानेवारी २०१५ व मंगळवार दि. १३ जानेवारी २०१५ ते सोमवार दि. १९ जानेवारी २०१५ पर्यंत दररोज सकाळी ५.३० ते ७.३० व संध्याकाळी ४ ते ६ या वेळात निःशुल्क आरोग्य शिबिर घेण्यात आले. यामध्ये स्थूलता, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदय रोग, सर्दी, ताप, अस्थमा, त्रिदोष निवारण, सांध्याचे उपचार, कॅन्सर, यौन रोग, उदर रोग इत्यादींवर तज्ञ योग शिक्षकांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

## उदयोन्मुख पत्रकार सत्कार सोहळा

मंडळाचे सभासद व दैनिक सकाळचे उदयोन्मुख तरुण तडफदार वार्ताहार श्री. मकरंद पटवर्धन यांना रत्नागिरी जिल्हा मराठी पत्रकार संघाचा ''पत्र सन्मान'' पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे मंडळाचे वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करण्यात येवून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## ''गमती भविष्याच्या'' कार्यक्रमाचे आयोजन

स्त्री जोतिषरत्न, ज्योतिर्य भूषण, आदर्श महिला 'अस्मिता पुरस्कार' असे पुरस्कार मिळालेल्या मुंबई येथील ज्योतिषविशारद पंडित मानसी यांचा रविवार दि. ११ जानेवारी २०१५ रोजी सायंकाळी ४ ते ७ या वेळात गमती भविष्याच्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पंडित मानसी यांनी भविष्य ह्या विषयातील विविध गोष्टींवर श्रोत्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. तसेच बारा राशींचे स्वभाव विशेष, मंगळ ग्रहासंबंधीची भिती, शनी ग्रहाची साडेसाती इत्यादी विषयावर आपली मते मांडली. सदर कार्यक्रमासाठी २०० श्रोते उपस्थित होते.

## कौतुक सोहळा

''गमती भविष्याच्या'' या कार्यक्रमाचे वेळी वसतीगृहातील विद्यार्थी कु. अक्षय संजीव कोकणे याने मुंबई विद्यापिठांतर्गत विभागीय स्तरावर युवा महोत्सवात वाद विवाद स्पर्धेत रौप्य पदक व कु. कपिल प्रकाश रानडे यांने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लॉ कॉलेजमधील वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला या दोन्ही विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.

## श्री सत्यनारायण पूजा

वसतिगृहातील विद्यार्थी दरवर्षी श्री सत्यनारायण पूजा करतात. यावर्षी रविवार दि. ११ जानेवारी २०१५ रोजी पूजा आयोजित करण्यात आली होती. पूजेला शहरातील विविध वसतिगृहातील विद्यार्थ्यांना, वसतिगृहाचे माजी विद्यार्थी आणि जवळच्या परिसरातील लोकांना बोलाविण्यात आले होते. यावेळी साधारणपणे पाचशे भाविकांनी तिर्थप्रसादाचा लाभ घेतला.

## मंडळातर्फे वीर सावरकर पुण्यतिथी साजरी

गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०१५ रोजी सावरकर पुण्यतिथीनिमित्त मंडळातर्फे लक्ष्मी चौक, गाडीतळ येथील वीर सावरकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकारीणी सदस्य उपस्थित होते. सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत पुणे येथील प्रसिध्द वक्ते ॲडव्होकेट नितीन माधव आपटे यांचे ''द्रष्टे सावरकर'' या विषयावर व्याख्यान झाले. त्यामध्ये त्यांनी स्वा. सावरकरांचे जीवन व कार्य याची माहिती दिली.

## मंडळाचा ८२ वा वर्धापन दिन सोहळा

शुक्रवार दि. २७ मार्च २०१५ रोजी मंडळाचा ८२ व्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मंडळातर्फे दरवर्षी देण्यात येण्याऱ्या कै. सुधा बडे आदर्श महिला पुरस्कार, वसतीगृह आदर्श विद्यार्थी पुरस्कार, लो. टिळक पारितोषिक, मंडळाचे ज्येष्ठ सभासद सत्कार, स्वा. वीर सावरकर शौय पुरस्कार, समशेर बहाद्दर पुरस्कार, संस्कृत विषयप्रेमी सत्कार वैगरे विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी मंडळाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ७५ वर्षे पूर्ण झालेल्या आजीव सदस्यांचा सत्कार

वयाची ७५ वर्षे पूर्ण झालेल्या ४५ आजीव सदस्यांना सत्काराचे आमंत्रण पाठविण्यात आले होते. त्यापैकी अनुक्रमे १) श्री. रामचंद्र शंकर देशमुख यांचे वतीने श्री. श्रीकांत अभ्यंकर, चिपळूण, २) श्री. बापूजी अनंत मायदेव, ३) श्री. शंकर नारायण आपटे, ४) श्री. जयराम पांडुरंग जोशी, ५) श्री. शशिकांत कृ. लिमये हे सत्कारमूर्ती सत्काराचे वेळी उपस्थित होते. त्यांचा सत्कार मंडळाचे अध्यक्ष ॲड. श्री. प्रभाकर गोविंद अभ्यंकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

## कै. सौ. सुधा वसंत बडे आदर्श महिला पुरस्कार

कै. श्री. वसंत वि. बडे यांनी ठेवलेल्या निधीतून कै. सौ. सुधा वसंत बडे स्मृतिप्रित्यर्थ आदर्श स्त्रियांचे सत्कार करण्यात आले. १) श्रीमती वंदना वासुदेव शेंड्ये, गणपतीपुळे, २) सौ. शर्मिला पटवर्धन, बँगलोर, ३) डॉ. सौ. स्वाती जितेंद्र बापट, नारींग्रे यांचे सत्कार मंडळाच्या सदस्या सौ. परचुरे यांनी साडी, श्रीफळ, पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्रक देऊन केला.

## संस्कृत विषयप्रेमीचा सत्कार

मंडळाकडून दरवर्षी संस्कृत प्रेमी व्यक्तीचा सत्कार करण्यात येतो. यावर्षी सौ. मुग्धा माधव पालकर पावस यांची निवड करण्यात आली. त्या संस्कृत विषयाच्या अध्यापनाचे काम स्वामी स्वरुपानंद विद्यामंदिर, पावस येथे २४ वर्षे करीत आहेत. त्यांचा सत्कार शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, प्रशस्तिपत्रक व रु. १०००/- रोख रक्कम देऊन करण्यात आला.

## स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर शौर्य पुरस्कार

मंडळाने यावर्षीपासूनच स्वा. सावरकर शौर्य पुरस्कार देण्यास सुरुवात केली. मंडळाकडे काही वर्षापूर्वी सदर निधी तयार करण्यात आला. त्यामध्ये मंडळाचे नेदरलॅडस्थित हितचिंतक यांनी भरघोस रक्कम जमा केल्यामुळे मंडळाला पुरस्कार वितरण करणे सुलभ झाले. सदर पुरस्कार हा एखादी व्यक्ती साहसी काम करीत असेल अशा व्यक्तीला द्यावा असा हेतू आहे.

यावर्षी १) श्री. जयवंत शिवाजी वाईरकर, देवरुख, २) श्री. सुरज मधुकर पवार, गणपतीपुळे यांना हा पुरस्कार देण्यात आला. सदर पुरस्कार मंडळाचे अध्यक्ष ॲड. श्री. प्रभाकर गो. अभ्यंकर व कोल्हापूर चित्पावन संघाचे कार्यवाह श्री. कानीटकर यांचे हस्ते देण्यात आले. पुरस्काराचे स्वरुप प्रशस्तीपत्र, रोख रु. ५,५००/- पुष्पगुच्छ व श्रीफळ असे होते. श्री. जयवंत वाईरकर हे राजू काकडे हेल्प ॲकॅडमीच्या अनेक साहसी मोहिमेत सातत्याने ६ वर्षे भाग घेत आहेत व स्वतःचा जीव धोक्यात घालून पर्यटकांना वाचविले आहे तसेच श्री. सुरज पवार हे गणपतीपुळे येथील समुद्रात बुडणाऱ्या पर्यटकांना वाचविण्यास सातत्याने तीन वर्षे मदत करीत आहेत.

## थोरेल बाजीराव पेशवे व मस्तानी पुत्र समशेर बहाद्दर पुरस्कार

मंडळाकडे सदर पुरस्कारासाठी नेदरलँडस्थित हितचिंतक यांनी निधी ठेवला आहे व त्या निधीतून यावर्षी प्रथमच सदर पुरस्काराचे वितरण करण्यात आले. सदर पुरस्कारासाठी सैनिकी शाळातून जो बेस्ट कॅडेट म्हणून निवडला जातो त्या विद्यार्थ्याला सदर पुरस्कार देण्यात यावा अशी अट आहे. यावर्षी गुरुवर्य दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा, तासगांव मधील कॅडेट ''अविनाश दिनकरराव डुबल'' याला पुरस्कार देण्यात आला. पुरस्काराचे स्वरुप प्रशस्तीपत्र, रोख रु. ७,५००/-, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे होते.

## वसतिगृह आदर्श विद्यार्थी पुरस्कार

वसतिगृहामध्ये रहाणाऱ्या विद्यार्थ्यांतून दरवर्षी एका विद्यार्थ्यांची ''आदर्श विद्यार्थी'' म्हणून निवड करण्यात येते. यावर्षी कु. अक्षय जीवन दाणी या विद्यार्थ्याची सन २०१४-१५ मधील आदर्श विद्यार्थी म्हणून निवड करण्यात आली. त्याचा प्रशस्तीपत्रक, रु. १०००/- चे पारितोषिक व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

## लो. टिळक पारितोषिके

ज्या विद्यार्थ्यांनी १२ वीचे परिक्षेत संस्कृत व गणित विषयात सर्वाधिक गुण मिळविलेले आहेत व पुढेही तेच विषय घेऊन रत्नागिरीतील गोगटे जोगळेकर महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत अशा विद्यार्थ्यांचे लो. टिळक जन्मशताब्दी निधीतून रोख रक्कमेचे पारितोषिक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येतात. यावर्षी ज्या विद्यार्थ्यांचे अध्यक्षांचे हस्ते सत्कार करण्यात आले त्यांची माहिति खालीलप्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) कु. आयुषी नंदकिशोर माणिक | संस्कृत | प्रथम क्रमांक (विभागून) | ९८ गुण | रु. १,२५०/- |
| २) कु. वसुमती विद्याधर करंदिकर | संस्कृत | प्रथम क्रमांक (विभागून) | ९८ गुण | रु. १,२५०/- |
| ३) कु. जान्हवी प्रभात पाध्ये | संस्कृत | द्वितीय क्रमांक | ९२ गुण | रु. २,०००/- |
| ४) कु. धनश्री वासुदेव लाड | संस्कृत | तृतीय क्रमांक | ८५ गुण | रु. १,०००/- |
| ५) कु. प्रथमेश किनरे | गणित | प्रथम क्रमांक | ९० गुण | रु. २,५००/- |
| ६) कु. अश्विनी काळे | गणित | द्वितीय क्रमांक विभागून | ८९ गुण | रु. १,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७) कु. कौस्तुभ बागाव | गणित | द्वितीय क्रमांक विभागून | ८९ गुण | रु. १,०००/- |
| ८) कु. योगेश्वरी सरपदे | गणित | द्वितीय क्रमांक विभागून | ८९ गुण | रु. १,०००/- |
| ९) कु. कांचन ठाकूर | गणित | तृतीय क्रमांक विभागून | ८८ गुण | रु. ५००/- |
| १०) कु. दिव्या पाटील | गणित | तृतीय क्रमांक विभागून | ८८ गुण | रु. ५००/- |
| ११) कु. शामली सावंत | गणित | तृतीय क्रमांक विभागून | ८८ गुण | रु. ५००/- |

## कै. सत्यभामाबाई फडके निधीतून अर्थसहाय्य

श्री. अरविंद महादेव व सौ. रेवतीबाई अरविंद साळवेकर रा. अमेरीका यांनी कै. सत्यभामाबाई फडके यांचे नावे निधी ठेवला असून सदर निधीचे व्याजाचा विनियोग जिला आर्थिक मदतीची गरज आहे अशा एखाद्या विधवा किवा परित्यक्ता स्त्रीला आर्थिक मदत देण्यासाठी करावयाचा आहे. यावर्षी श्रीमती भाग्यश्री अनिल सोवनी, रत्नागिरी व श्रीमती मीनल मनोहर करमरकर, रत्नागिरी यांना प्रत्येकी रु. ५०००/- ची आर्थिक मदत देण्यात आली.

## वधुवर सुचक

आपल्या मंडळामार्फत ब्राह्मण समाजातील उपवर वर-वधूंची नाममात्र शुल्क घेवून नोंदणी करण्यात येते व अशा नोंदणीकृत वधू-वरांची सूची मंडळाच्या कार्यालयात उपलब्ध होते.

## बिनव्याजी परतफेड शिष्यवृत्ती योजना

चित्पावन ज्ञातीतील गरजू, बुध्दीमान व होतकरु अशा विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करणे हा मंडळाचा मुख्य उद्देश आहे. त्याला अनुसरुन मंडळाकडे ज्या निधिदात्यानी परतफेड शिष्यवृत्ती निधीसाठी देणग्या दिल्या आहेत. त्या निधीच्या येणाऱ्या व्याजातून सन २०१४-१५ मध्ये २४ विद्यार्थ्यांना रु. ५,८२,९००/- एवढी शिष्यवृत्ती देण्यात आली.

**गेल्या सहा वर्षात दिलेली शिष्यवृत्ती दर्शविणारा तक्ता :-**

| क्र. | सन | विद्यार्थी संख्या | दिलेली शिष्यवृत्ती |
|---|---|---|---|
| १. | २००९-१० | २० | २,११,०००/- |
| २. | २०१०-११ | १६ | २,३८,५००/- |
| ३. | २०११-१२ | २४ | ५,०२,०००/- |
| ४. | २०१२-१३ | २७ | ६,६५,०००/- |
| ५. | २०१३-१४ | १८ | ४,५६,५००/- |
| ६. | २०१४-१५ | २४ | ५,८२,९००/- |

## विना परतफेड शिष्यवृत्ती योजना

मंडळाने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ३ विद्यार्थ्यांना रक्कम रु. २५,०००/- व चालू आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये ३ विद्यार्थ्यांना रक्कम रु. १२,९००/- चे अर्थ सहाय्य केले आहे.

## विविध पारितोषिके

काही निधीदात्यांनी मंडळाकडे विशिष्ट अशा अटीनुसार देणग्या दिल्या असून त्या अटीमध्ये बसणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी रोख रक्कमेची पारितोषिके दिली जातात. सन २०१४-१५ मध्ये सदर अटीन्वये रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २७ शाळातील ८६ विद्यार्थी व एका महाविद्यालयातील १६ विद्यार्थ्यांना रु. ४८,२५०/- ची पारितोषिके देण्यात आली.

## परत आलेल्या अहवालांचा उल्लेख

सन २०१३-१४ च्या पाठविलेल्या अहवालापैकी १८ अहवाल परत आले त्यांची नोंद संस्था दप्तरी करण्यात आली आहे.

## बहुउद्देशीय सभागृहे

'मंडळाचे इमारतीच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर अनुक्रमे मातोश्री पार्वतीबाई व पिताश्री शंकर विनायक पटवर्धन सभागृह व भगवान श्री परशुराम सभागृह अशी दोन सभागृहे आहेत. ती दोन्ही सभागृहे विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक अशा उपक्रमांसाठी उपलब्ध करुन देण्यात येतात. ही सभागृहे सर्व सुखसोयीनी परिपूर्ण असून या सभागृहांमध्ये मंडळाच्या अनेक कार्यक्रमांबरोबरच समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात येते. ही दोन्ही सभागृहे लग्न, मुंज, साखरपुडा, वाढदिवस, बारसे, मंगळागौर अशा विविध शुभकार्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतात. मातोश्री पार्वतीबाई व पिताश्री शंकर विनायक पटवर्धन सभागृहामध्ये जवळपास १०० ते १२५ लोकांची बसण्याची व्यवस्था आहे. तर भगवान श्री परशुराम सभागृहामध्ये २५० ते ३०० लोक बसू शकतात.

यावर्षात सुमारे २१ विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन त्यामधून रु. ४६,६००/- ची ऐच्छिक देणगी मंडळाला मिळाली.

## औषधोपचारासाठी अर्थसहाय्य

सौ. श्रध्दा श्रीपाद फडके, रा. कुवेशी, ता. राजापूर या किडणीच्या विकाराने आजारी असल्याने व त्यांची आर्थिक स्थिती बेताची असल्याने त्यांना मंडळाकडून रु. १८,०००/- ची वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक मदत देण्यात आली.

## विश्रांतीका

मंडळाचे इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर रोज सुसज्ज अशा विश्रांतिका आहेत. त्या दोन्ही विश्रांतीकात सहाजण आराम करु शकतील, अशी सुविधा आहे. बाहेरगावाहून पर्यटनासाठी येणाऱ्या किंवा कोणत्याही कामासाठी येणाऱ्या चित्पावन ज्ञातीतील लोकांची या विश्रांतीकांमध्ये निवासाची व्यवस्था होऊ शकते. या वर्षात सुमारे ५० ते ५५ माणसे राहून गेली व त्यांनी रु. २०,६००/- ची ऐच्छिक देणगी मंडळात जमा केली.

## अन्नदान निधीतून अर्थसहाय्य

मंडळाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना यावर्षी अन्नदान निधीतून रक्कम रु. ३५,३७५/- चे अर्थसहाय्य करण्यात आले.

# अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ, रत्नागिरी.

| | | |
|---|---|---|
| **✻ मंडळाचे विद्यमान पदाधिकारी ✻** | | |
| १) श्रीम. नीला मोहन पालकर | उपाध्यक्षा | २३२३२१/९८९०५६५३१९ |
| २) श्री. श्रीकृष्ण मोरेश्वर केळकर | उपाध्यक्ष | २२४०१८/८४८२९९०४३६ |
| **✻ मंडळाची विद्यमान कार्यकारिणी ✻** | | |
| १) श्री. श्रीनिवास त्रिंबक जोशी | कार्याध्यक्ष | २२४०१०/९४०४३३२७०५ |
| २) श्री. नारायण विष्णू शेवडे | उपकार्याध्यक्ष | ९४२११३९४०६ |
| ३) श्री. राजेंद्र विष्णू पटवर्धन | कार्यवाह | ९८६०३६६९९१, ९४२०४४०३०३ |
| ४) सीए. श्रीरंग पांडुरंग वैद्य | कोषाध्यक्ष | २२२३९५/९४२२०५४२८० |
| ५) सौ. स्नेहा अरुण परचुरे, गुहागर | सदस्या | ०२३५९-२४०३५१, ९४२२६४६३२५ |
| ६) सौ. अनघा विनोद आठवले | सदस्या | २२३४७६/९४२३९४५८०६ |
| ७) सौ. वर्षा राजन जोशी | सदस्या | २२४३८५/८६००४२७३०८ |
| ८) श्री. आनंद माधव मराठे | सदस्य | २२४३०९/९४२२४३१४९० |
| ९) श्री. वैजनाथ मोरेश्वर दामले | -,,- | २३२५३१/९४०५९५७६९६ |
| १०) श्री. श्रीकृष्ण जनार्दन जोशी | -,,- | २२३४४५ |
| ११) श्री. विनायक रामकृष्ण जोशी | -,,- | २२६२१३/९४२२४३०७६३ |
| १२) श्री. शरद बाजीराव वैद्य, दापोली | -,,- | ०२३५८-२८२४६८/९४२०३७६८५६ |
| १३) श्री. सदानंद कृष्णाजी चितळे,चिपळूण | -,,- | ०२३५५-२५२९६७/९८९०७४९७९४ |
| १४) श्री. अनंत महादेव भिडे | -,,- | २२०९६५/७५०७३४६४४८ |
| १५) श्री. विजय लक्ष्मण लिमये | -,,- | २२५५०४/९१४५६५८१९८ |
| १६) श्री. अनंत मुकुंद आगाशे | -,,- | २२८६९७/८१४९२२२९७५ |
| १७) श्री. संदिप गजानन रानडे | -,,- | ९४२११३७८८८ |
| १८) श्री. शेखर लक्ष्मण लेले | -,,- | ९९६०८५४०७३ |
| **✻ मंडळाचा विद्यमान कर्मचारी वृंद ✻** | | |
| १) श्री. सुधाकर यशवंत वैद्य | कार्यालय प्रमुख | ९४२०९६६२८१ |
| २) श्री. योगेश शशिकांत ओक | वसतिगृह व्यवस्थापक | ९४२००५२७४१, ९४२२६२८१३७ |

## अहवाल वर्षात झालेले सभासद

## ''आ'' वर्ग-आश्रयदाता (वर्गणी रु. १००१/-)

१) श्री. रामकृष्ण श्रीपाद गाडगीळ, मिरज, २) श्री. सुबोध यशवंत ताम्हनकर, रत्नागिरी, ३) सौ. विशाखा मोहन भिडे, रत्नागिरी, ४) श्री. संजीव नारायण कोकणे, आडे, ५) श्री. विद्याधर दत्तात्रय मेहेंदळे, रत्नागिरी, ६) श्री. दिगंबर जनार्दन साठे, रत्नागिरी, ७) श्री. शशांक यशवंत बर्वे, ठाणे, ८) श्री. निलेश नागेश केळकर, रत्नागिरी, ९) श्री. सतीश यशवंत रानडे, रत्नागिरी, १०) सौ. शर्मिला पटवर्धन फाटक, बँगलोर, ११) सौ. राधिका दिलीप पटवर्धन, रत्नागिरी, १२) श्री. दिलीप सुरेश पटवर्धन, रत्नागिरी, १३) सौ. चैताली शेखर पटवर्धन, रत्नागिरी, १४) श्री. ओंकार वासुदेव काळे, मिरज, १५) श्री. शांताराम रामचंद्र जोशी, चिपळूण, १६) श्री. जनार्दन रामचंद्र जोशी, चिपळूण, १७) श्री. शेखर सुरेश पटवर्धन, रत्नागिरी.

## 'इ' वर्ग हितेच्छू (वर्गणी रु. ५०१/-)

१) श्री. मकरंद गंगाधर पटवर्धन, रत्नागिरी.

## देणग्या

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. विक्रांत शिंदे, रत्नागिरी | १,०००/- |
| २) | श्री. योगेश शशिकांत ओक, रत्नागिरी | ५००/- |
| ३) | श्री. प्रद्योत जोगळेकर, रत्नागिरी | २,०००/- |
| ४) | श्रीमती सुषमा भाताडे, रत्नागिरी | १,२००/- |
| ५) | श्री. मयुर कुलकर्णी, रत्नागिरी | २५०/- |
| ६) | श्री. पर्शुराम साळगांवकर, मुंबई | १,०००/- |
| ७) | श्री. अविनाश निवृत्ती मलुष्टे, रत्नागिरी | २,०००/- |
| ८) | श्रीमती उषा विजय शिंदे, रत्नागिरी | २,०००/- |
| ९) | श्री. ओंकार अनंत भालेराव, खानापूर | १,५००/- |
| १०) | खल्वायन संस्था, रत्नागिरी | ८००/- |
| ११) | सौ. अक्षदा जोशी, मुंबई | ७००/- |
| १२) | संगणक परिचालक संघटना रत्नागिरी तालुका | ५,२००/- |
| १३) | श्री. हेमंत कुलकर्णी, बडोदा | १,४००/- |
| १४) | सौ. अनघा अनिल वैद्य, रत्नागिरी | ५००/- |
| १५) | श्री. शशांक जोशी, देवरुख | १०,०००/- |
| १६) | श्री. वसंत प्रल्हाद गोडबोले, डोंबिवली | ४००/- |
| १७) | श्री. प्रभाकर रघुनाथ करमरकर, रत्नागिरी | ५०१/- |
| १८) | श्री. योगेश विलास आघारकर, पुणे | ३,६००/- |
| १९) | कु. प्रज्ञा नारायण गोखले, कर्जत | १,०००/- |
| २०) | सौ. मिनल राहूल सोहनी, रत्नागिरी | २,०००/- |
| २१) | कु. स्मिता भालचंद्र करंदीकर, धालवली | २००/- |
| २२) | श्री. अशोक भास्कर आमडेकर, देवरुख | ५००/- |
| २३) | श्री. नंदकिशोर जगन्नाथ पटवर्धन, रत्नागिरी यांचेकडून आई वडिलांचे स्मरणार्थ | ५०१/- |
| २४) | श्री. मंदार भालचंद्र नरवणे, पुणे | ४,०००/- |
| २५) | श्री. रामचंद्र अ. परचुरे व सौ. स्वाती रा. परचुरे, दापोली यांजकडून वडीलांचे स्मरणार्थ. | ४००/- |
| २६) | स्नेहल हौसींग को-ऑप. हौसींग सोसायटी, रत्नागिरी | ५००/- |
| २७) | श्री. राजेंद्र विष्णू पटवर्धन, रत्नागिरी यांजकडून निरीक्षण गृह व बालगृह रत्नागिरी या संस्थेला दि. २-११-२०१४ या दिवशी देण्यासाठी | ५,०००/- |
| २८) | श्री. प्रकाश गांधी, रत्नागिरी | १,०००/- |
| २९) | ॲड. श्री. अनिरुध्द रामचंद्र पटवर्धन, मुंबई यांजकडून मुलीचे विवाह प्रित्यर्थ. | १,०००/- |
| ३०) | सीलेक्ट ऑटोमोबाईल्स्, पुणे | १,०००/- |
| ३१) | श्री. मुकुंद नागेश जोशी, पुणे | १,०००/- |
| ३२) | चेसमेन रत्नागिरी यांजकडून | १,१००/- |
| ३३) | श्री. नंदकुमार दत्तात्रय जोशी, रत्नागिरी | १०१/- |

३४) श्री. विवेक गोखले, रत्नागिरी ६००/-
३५) श्री. तेजस दिपक पेंडसे, चिपळूण ५००/-
३६) श्री. व्ही. के. सरपोतदार, रत्नागिरी १,५००/-
३७) सौ. अश्विनी आनंद पटवर्धन, रत्नागिरी १,०००/-
३८) कु. पूजा पद्माकर दामले, मुंबई ५००/-
३९) श्री. प्रविण सुधाकर पुराणीक, रत्नागिरी ३,०००/-
४०) कु. स्नेहा श्रीपाद रानडे, रत्नागिरी १,०००/-
४१) कु. मयुरेश श्रीपाद रानडे, रत्नागिरी १,०००/-
४२) श्री. हर्षवर्धन जोशी, आडे २००/-
४३) श्री. उदय भास्कर भाट्ये, देवरुख १,१०१/-
४४) श्री. श्रीकृष्ण मोरेश्वर केळकर, रत्नागिरी ५०/-
४५) स्वप्नपूर्ती विवाह संस्था, सांगली २,५००/-
४६) श्री. दयानंद बनसोडे, सांगली १,५००/-
४७) श्री. मयूर कुलकर्णी, रत्नागिरी ३००/-
४८) क्षत्रीय मराठा मंडळ, रत्नागिरी ६००/-
४९) श्री. पद्मनाभ विनायक जोशी, रत्नागिरी ५,०००/-
५०) श्री. हिम्मत ओहाळे, सांगली १०,०००/-
५१) पंडीत मानसी, मुंबई १,७५०/-
५२) सौ. भाग्यश्री देसाई, रत्नागिरी २,०००/-
५३) श्री. मनोहर गणेश घैसास, रत्नागिरी २००/-
५४) श्री. प्रदिप चंद्रकांत दिवाडकर, रत्नागिरी ३,०००/-
५५) श्री. प्रकाश गजानन काळे, रत्नागिरी १२५/-
५६) श्री. भरत जैन, रत्नागिरी २,०००/-
५७) श्री. जयराम पांडुरंग जोशी, रत्नागिरी ५००/-

**प्लॅस्टीक खूर्च्या घेण्यासाठी**

५८) श्री. शरद बाजीराव वैद्य, दापोली ६,०००/-
५९) सौ. अनघा विनोद आठवले, रत्नागिरी ६,०००/-

**एकूण - १,०१,२७९-००**

## मंडळ व्यवस्थापन व परतफेड शिष्यवृत्तीसाठी आलेल्या देणग्या

| देणगीदाराचे नांव | मंडळ व्यवस्थापन निधी | परतफेड शिष्यवृत्ती निधी |
|---|---|---|
| १) कु. ओंकार उल्हास जोग, कुवारबांव | ५००/- | ५००/- |
| २) कु. अक्षता पांडुरंग घाणेकर, चिपळूण | १,५००/- | १,५००/- |
| ३) कु. विनया माधव फाटक, इचलकरंजी | ५५०/- | ५५०/- |
| ४) कु. ऋषिराज दिलीप फाटक, रत्नागिरी | ५०/- | ५०/- |
| ५) श्री. योगेश विलास आघारकर, पुणे | १,२००/- | १,२००/- |
| ६) श्री. ओंकार वासुदेव काळे, मिरज | १,५००/- | १,५००/- |
| ७) कु. प्रज्ञा नारायण गोखले, कर्जत | १,०००/- | १,०००/- |
| ८) कु. अकल्पीता-प्रकाश जोशी, वेळास | ५००/- | ५००/- |
| ९) श्री. अनिकेत दत्तात्रय केळकर, रत्नागिरी | १,०००/- | १,०००/- |
| १०) श्री. महेश अनिल जोशी, फलटण | १,३००/- | १,३००/- |
| ११) कु. गीता दिलीप सहस्रबुध्दे, फलटण | १००/- | १००/- |
| १२) कु. गौरी दिलीप सहस्रबुध्दे, फलटण | ५०/- | ५०/- |

| | | |
|---|---|---|
| १३) कु. वैभव विनाय गाडगीळ, गोवा | ३००/- | ३००/- |
| १४) कु. स्मीता भालचंद्र करंदीकर, धालवली | १५०/- | १५०/- |
| १५) कु. प्रणाली विलास आघारकर, पुणे | २,०००/- | २,०००/- |
| १६) डॉ. प्रा. महेश माधव भागवत, देवरुख | १,००१/- | --- |
| १७) सौ. सुशिला बळवंत जोशी, पुणे | २,५००/- | --- |
| १८) श्री. बळवंत मुरलीधर जोशी, पुणे | २,५००/- | --- |
| १९) नेदरलँडस्थित हितचिंतक यांजकडून | ५०,०००/- | --- |
| २०) श्री. मनोज मोहन ताम्हनकर, सावंतवाडी | ३००/- | ३००/- |
| २१) श्री. महेश मोहन ताम्हनकर, सावंतवाडी | २५०/- | २५०/- |
| २२) श्री. अमोघ गणेश गोमरकर, गिम्हवणे | १५०/- | १५०/- |
| २३) श्री. समीर मुकुंद परांजपे, खेर्डी | १,५००/- | १,५००/- |
| २४) कु. प्राची गोविंद काळे, कुवारबांव | ३००/- | ३००/- |
| २५) श्री. अमोल मुकुंद करमरकर, खालापूर | ४००/- | ४००/- |
| २६) श्री. ॲड. श्री. प्रभाकर गोविंद अभ्यंकर | ९००/- | --- |
| २७) कु. श्रध्दा उर्फ प्रणिता श्रीराम बर्वे, गोवा | १५०/- | १५०/- |
| २८) श्री. संदिप सुरेश पेंडसे, मुर्डी | १००/- | १००/- |
| २९) श्री. परेश गोविंद काळे, कुवारबांव | १,९००/- | १,९००/- |
| ३०) कु. स्नेहा श्रीपाद रानडे, रत्नागिरी | ५,०००/- | ५,०००/- |
| ३१) श्री. मयुरेश श्रीपाद रानडे, रत्नागिरी | १,५००/- | १,५००/- |
| ३२) कु. अवंती अरविंद गोरे, पुणे | ७५०/- | ७५०/- |
| ३३) श्री. शंतनू सतिश भिडे, रा. ठाणे | ७५०/- | ७५०/- |
| ३४) कु. स्नेहा अनिल साठे, सांगली | ३,५००/- | ३,५००/- |
| ३५) श्री. स्वरुप लक्ष्मण घैसास, रत्नागिरी | ४००/- | ४००/- |
| **एकूण** | **८५,५५१/-** | **२८,६५०/-** |

## संगीत नाट्य महोत्सवासाठी आलेली देणगी

१) सौ. प्रमिला पांडुरंग वैद्य, रत्नागिरी रु. १,५००/-

## किर्तन महोत्सवासाठी आलेल्या देणग्या

१) श्री. मनोहर शिवराम फाटक, देवरुख रु. ५००/-

२) सौ. शालिनी शिवराम केतकर रु. ५००/-

| | | |
|---|---|---|
| ३) | श्रीमती सुलभा वैद्य, रत्नागिरी | रु. १०२/- |
| ४) | श्रीमती सुगंधा दामले, रत्नागिरी | रु. ५२/- |
| ५) | श्री. भास्कर आत्माराम केळकर | रु. ५०१/- |
| ६) | श्री. पांडुरंग पर्शुराम कान्हेरे | रु. १०१/- |
| ७) | सौ. राधिका श्रीरंग वैद्य | रु. १००/- |
| ८) | श्री. वैजनाथ मोरेश्वर दामले | रु. २००/- |
| ९) | श्री. शशिकांत भास्कर भावे | रु. ५००/- |
| १०) | श्रीमती माणिकताई परांजपे | रु. १,०००/- |
| | **एकूण** | **रु. ३,५५६/-** |

## मुद्दल विनियोग अन्नदान निधीसाठी

| | |
|---|---|
| १) श्री. प्रथमेश हेमंत बेडेकर यांजकडून वडिलांचे स्मरणार्थ | रु. २००/- |
| २) श्री. माधव गजानन सहस्रबुध्दे, रा. पुणे यांजकडून आई वडिलांचे स्मरणार्थ | रु. २,०००/- |
| ३) श्री. सदाशिव दत्तात्रय घाणेकर, रत्नागिरी यांजकडून आई वडिलांचे स्मरणार्थ | रु. २००/- |
| ४) श्री. अशोक पांडुरंग पेंडसे, रा. खेर्डी, चिपळूण यांजकडून कै. जानकीबाई विष्णू साने यांचे स्मरणार्थ | रु. १०,०००/- |
| ५) श्री. किसन यशवंत मायदेव, रा. जालगांव, दापोली यांजकडून श्री. वामन गोडबोले, रा. सोमेश्वर यांना देण्यासाठी | रु. ५,०००/- |
| ६) श्री. शशिकांत मोरेश्वर नातू, रा. रत्नागिरी यांजकडून कै. सौ. शकुंतला शशिकांत नातू हिचे स्मरणार्थ | रु. ५००/- |
| ७) श्री. सतीश श्रीराम सहस्रबुध्दे, रत्नागिरी यांजकडून | रु. १,०००/- |
| **एकूण** | **रु. १८,९००/-** |

## उत्पन्न विनियोग निधी व निधीत भर (अन्नदान निधी)

| | |
|---|---|
| १) देशमुख कुटुंबीय रा. लांजा यांजकडून कै. केशव नारायण देशमुख यांचे स्मरणार्थ | रु. २०,०००/- |
| व कै. इंदिराबाई केशव देशमुख यांचे स्मरणार्थ | रु. २०,०००/- |
| २) श्री. किसन यशवंत मायदेव रा. जालगांव यांजकडून कै. यशवंत वासुदेव मायदेव यांचे स्मरणार्थ | रु. १०,०००/- |
| ३) सौ. माया के. आपटे अन्नदान निधीत भर सौ. माया के. आपटे व श्री. केशव वा. आपटे, रा. सांगली यांजकडून | रु. १,०००/- |
| ४) श्री. श्रीकृष्ण मोरेश्वर दामले व कुटुंबीय, शिरगांव यांजकडून कै. सौ. भाग्यश्री श्रीकृष्ण दामले व श्रीकृष्ण मोरेश्वर दामले अन्नदान निधीत भर | रु. १,०००/- |
| **एकूण** | **रु. ५२,०००/-** |

# अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ, रत्नागिरी.

## उत्पन्न विनियोग शिष्यवृत्ती निधी

| | |
|---|---|
| १) श्री. कृष्ण गंगाराम भावे, रा. गोवंडी (पूर्व), मुंबई यांजकडून | रु. ५,०००/- |
| २) श्रीमती सुशिला केशव जोशी, रा. डोंबिवली (पश्चिम) यांजकडून | रु. ५,०००/- |
| कै. केशव पुरुषोत्तम जोशी यांचे स्मरणार्थ | |
| ३) श्रीमती लिलावती ल. जोगळेकर, रा. विलेपार्ले (पूर्व), मुंबई यांजकडून | रु.१,००,०००/- |
| ४) चित्पावन गार्ग्यगोत्री घाणेकर कुलवृत्तांत समिती, पुणे यांजकडून | रु. ५०,०००/- |
| ५) श्रीमती सुमती ब्रह्मा आठवले, रा. दापोली यांजकडून | रु. ११,०००/- |
| कै. ब्रह्मा सिताराम आठवले यांचे स्मरणार्थ | |
| ६) कै. महादेव गणेश आणि रजनी महादेव आठवले ट्रस्ट मुंबई या निधीत भर | रु. ५०,०००/- |
| ७) जोगळेकर कुलवृत्तांत समिती, पुणे यांजकडून | रु. ५,०००/- |
| **८) शिक्षण निधीत भर** | |
| १) श्री. विश्वास गणेश दातार, रा. औंध पुणे यांजकडून | रु. ५,०००/- |
| कै. गणेश दामोदर दातार यांचे स्मरणार्थ | |
| २) सौ. छाया शशिकांत नातू, रत्नागिरी यांजकडून | रु. ५००/- |
| ३) श्री. श्रीराम महादेव ओक, रा. मालाड यांजकडून | रु. १,०००/- |
| **एकूण** | **रु.२,३२,५००/-** |

## उत्पन्न विनियोग पारितोषिक निधी

| | |
|---|---|
| १) श्री. काशिनाथ महादेव जोशी, रा. कांदिवली यांजकडून | |
| कै. श्री. महादेव गणेश जोशी पारितोषिक निधीत भर | रु. ५००/- |
| श्रीमती गिरीजाबाई महादेव जोशी पारितोषिक निधीत भर | रु. ५००/- |
| श्री. काशिनाथ महादेव जोशी पारितोषिक निधीत भर | रु. ५००/- |
| **एकूण** | **रु. १,५००/-** |


**अखिल चित्पावन ब्राह्मण सेवा संस्था संचालित**

## अखिल भारतीय चित्पावन ब्राह्मण महासंघ

* **महासंघाचे उद्दिष्ट व ध्येय :-** पहिल्या खंडाप्रमाणे खंड २ (वर्ष १८२१ ते १९२०) आणि खंड ३ (वर्ष १९२१ ते २०००) या कालावधीत विविध क्षेत्रात उत्तुंग कार्य केलेल्या ज्ञात व अज्ञात चित्पावन ब्राह्मणांच्या योगदानाची माहिती संकलीत करुन दोन्ही खंड सन २०१६ पूर्वी प्रकाशित करणे.
* **महासंघातर्फे आवाहन :-** प्रकाशित होणाऱ्या कोषाच्या पृष्ठदानासाठी रु. २०००/- आणि महासंघाच्या कायमस्वरुपी निधीसाठी रु. ११,०००/- देऊन आजीव पालक सदस्यत्व स्वीकारावे, असे आवाहन महासंघाच्या वतीने सर्व चित्पावनांना करण्यात येत आहे.

**अधिक माहिती - श्री. माधव घुले, डोंबिवली - (०२५१) २८६१५६२, ९५९४९९६६४६**
**ईमेल** - ghulemadhav_5152@rediffmail.com

## सन २०१४-१५ मध्ये दिलेल्या शिष्यवृत्तीची यादी

| क्र. | विद्यार्थ्यांचे नांव व गांव | अभ्यासक्रम | दिलेली परतफेड शिष्यवृत्ती |
|---|---|---|---|
| १. | कु. प्रसाद प्रमोद सोमण, खेड | इंजिनियरींग | ५०,०००/- |
| २. | कु. श्रीरंग अनिल सोवनी, रत्नागिरी **(वि. प.)** | शालेय | ५,७००/- |
| ३. | कु. रसिका रोहीत पटवर्धन, रत्नागिरी **(वि. प.)** | शालेय | ६,०००/- |
| ४. | कु. किर्ती रामचंद्र गोरे, दापोली | बी. सी. ए. | ३०,०००/- |
| ५. | सौ. प्रज्ञा प्रसन्न दामले, शिरगांव | बी. एड. | ३५,०००/- |
| ६. | कु. अमृता विजय भट, शिरगांव | सी. ए. | २०,०००/- |
| ७. | कु. श्रीहर्ष श्रीनिवास आपटे, आडीवरे | एम्. ए. | २५,०००/- |
| ८. | कु. श्रद्धागौरी श्रीपाद मराठे, पडेल | सी. ए. | २५,०००/- |
| ९. | कु. श्वेता उदय जोग, हावनूर | इंजिनियरींग | ३०,०००/- |
| १०. | कु. स्नेहा सुर्यकांत फडके, इचलकरंजी | कॉम्प्युटर इंजि. | ४०,०००/- |
| ११. | कु. राधा जयंत सहस्रबुध्दे, फलटण | आर्किटेक्चर | ४०,०००/- |
| १२. | कु. चंद्रशेखर विश्वनाथ फडके, कुर्धे | बी. एस्. सी. (आय.टी.) | २०,०००/- |
| १३. | कु. अनुराग अनिरुध्द गोखले, वेरळ | बी. फार्मसी | ३०,०००/- |
| १४. | कु. अनुराधा अनंत केळकर, कासारवेली **(वि. प.)** | सी. ए. | १,२००/- |
| १५. | कु. कपील प्रकाश रानडे, नाटे | लॉ. कोर्स | १५,०००/- |
| १६. | कु. ईशा राजीव गोडबोले, पुणे | उच्च शिक्षण (जर्मनी) | ५०,०००/- |
| १७. | कु. चिन्मय धुडिराज साठे, जमखंडी | इंजिनियरिंग | २५,०००/- |
| १८. | कु. ऋषीकेष गणेश सावरकर, आबीटगांव | कॉम्प्युटर इंजिनियरिंग | २५,०००/- |
| १९. | कु. मंगेश जनार्दन जोशी, चिपळूण | इंजिनियरिंग | १०,०००/- |
| २०. | कु. गुरुराज मनोज पाटणकर, रत्नागिरी | बी. ए. एम्-एस्. | ४०,०००/- |
| २१. | कु. अनिकेत माधव काणे, गुहागर | कॉमर्स | ५,०००/- |
| २२. | कु. अबोली उल्हास बागूल, श्रीरामपूर | सी. ए. | २०,०००/- |
| २३. | कु. उत्कर्ष शांताराम जोशी, चिपळूण | इंजिनियरिंग | २५,०००/- |
| २४. | कु. स्वाती लक्ष्मण चैसास, रत्नागिरी | सी. ए. | १०,०००/- |
| | **एकूण** | | **५,८२,९००/-** |

**खुषखबर** चित्पावन सेवा संघ ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड महानगर (पुणे) या सन १९९८ मध्ये स्थापन झालेल्या संघाने नुकतेच श्रीमती सुनीता छत्रे यांनी बक्षिसपत्राने संघास दिलेल्या जागेत स्वतःचे कार्यालय सुरु केले आहे. ***विश्वस्त - श्री. प्रभाकर लेले, दूरध्वनी क्र. २७४५३६४८***

| क्र. | निधीचे नांव | वर्षारंभी शिल्लक | चालू जमा | चालू खर्च | अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १. | गंगाजळी | ६,०९,१०९-४८ | ७१,०७६-०० | ०-०० | ६,८०,१८५-४८ |
| २. | मंडळ | १२,२०,७९३-४४ | ५,५९,८९२-५९ | ५,५०,००५-०० | १२,३०,६८१-०३ |
| ३. | घसारा निधी | ७,२५,२५२-९६ | १,००,०३५-०० | ०-०० | ८,२५,२८७-९६ |
| ४. | सेवक वर्ग सेवा उपदान व विमा हप्ता | ६२,३८०-९० | ५,४२७-०० | १,१२०-०० | ६६,६८७-९० |
| ५. | व्यवस्थापन निधी मंडळ | २५,१४,५४४-६० | ३,१०,२६७-०० | ७९,९४३-०० | २७,४४,८६८-६० |
| ६. | वसतिगृह व्यवस्थापन निधी | ७१,२२१-०० | ४,७४६-०० | ०-०० | ७५,९६७-०० |
| ७. | श्री. श्रीराम भिकाजी वेलणकर (सांस्कृतिक निधी) | ४,५७५-०० | २६१-०० | ५२-०० | ४,७८४-०० |
| ८. | कै. सौ. सुधा वसंत बडे निधी कोळथरे | ५३,१७१-३० | ४,३५०-०० | ६,१७०-०० | ५१,३५१-३० |
| ९. | कै. वासुदेव ग. सहस्त्रबुध्दे | ३,०४५-०० | २६१-०० | २५२-०० | ३,०५४-०० |
| १०. | इमारत देखभाल निधी | १,३४,०७०-०० | १०,४४०-०० | २,२८८-०० | १,४२,२२२-०० |
| ११. | अहवाल छपाई निधी | २,६०३-०० | १७४-०० | ०-०० | २,७७७-०० |
| १२. | सांस्कृतिक कार्यक्रम निधी | १,८९,०४९-२५ | १६,४४७-०० | ३,२८९-०० | २,०२,२०७-२५ |
| १३. | कै. लक्ष्मण विठ्ठल पटवर्धन सांस्कृतिक निधी | १,१४,५५२-०० | ८,७००-०० | १४,७६६-०० | १,०८,४८६-०० |
| १४. | सौ. राधाबाई गोपाळराव गद्रे सांस्कृतिक निधी | ६७,३०८-०० | ४,३५०-०० | ८७०-०० | ७०,७८८-०० |
| १५. | नेदरलॅण्डस्थित हितचिंतक सांस्कृतिक कार्यक्रम निधी | १,०९,२८८-०० | ८,७००-०० | १,७४०-०० | १,१६,२४८-०० |
| १६. | श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे स्मृति पुरस्कार निधी | ५,०४७-०० | ४०१-०० | ०-०० | ५,४४८-०० |
| १७. | कै. नारायण रघुनाथ गोडसे औषधोपचार निधी | ५,३७६-०० | ४३५-०० | ६८७-०० | ५,१२४-०० |
| १८. | कै. श्रीम. सत्यभामा फडके निधी | १,७०,०००-०० | १४,७९०-०० | १२,९५८-०० | १,७१,८३२-०० |
| १९. | अनामत खाते | १०,०००-०० | ०-०० | ०-०० | १०,०००-०० |
| | **एकूण** | **६०,७१,३८६-९३** | **११,२०,७५२-५९** | **६,७४,१४०-००** | **६५,१७,९९९-५२** |

अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळ, रत्नागिरी.

## [illegible]

| क्र. | निधीचे नाव | वर्षारंभीची शिल्लक | चालू वर्षातील जमा | एकूण | चालू वर्षातील खर्च | अखेरची शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनु. क्र. १ ते ११ (पा.क्र. ११ पहावे) | ६०,७१,३८६-९३ | ११,२०,७५२-५९ | ७१,९२,१३९-५२ | ६,७४,१४०-०० | ६५,१७,९९९-५२ |
| २. | [illegible] निधी | ७,९३,५६१-०० | १,३०,६८०-०० | ९,२४,२४१-०० | ७०,३२७-०० | ८,५३,९१४-०० |
| ३. | [illegible] निधी | ११,३१९-७५ | --- | ११,३१९-७५ | --- | ११,३१९-७५ |
| ४. | [illegible] निधी | ५२,३०,१७६-०० | १२,५९,६८१-०० | ६४,८९,८५७-०० | ६,६९,८३१-०० | ५८,२०,०२६-०० |
| ५. | [illegible] निधी | ९,११,७०३-०० | ७३,३८७-०० | ९,८५,०९०-०० | ८०,७०७-०० | ९,०४,३८३-०० |
| ६. | [illegible] निधी | ५१,३५९-०० | ३,८९४-०० | ५५,२५३-०० | ७८०-०० | ५४,४७३-०० |
| ७. | [illegible] | ३२,५१६-९९ | १२,५००-०० | ४५,०१६-९९ | २,०००-०० | ४३,०१६-९९ |
| | एकूण | १,३१,०२,०२२-६७ | २६,००,८९४-५९ | १,५७,०२,९१७-२६ | १४,९७,७८५-०० | १,४२,०५,१३२-२६ |

* आमचे बँकर्स ( बँकेचे नाव व त्यांचे खाते क्रमांक) *

१. युको बँक, शाखा रत्नागिरी - २१७२०११००००५२६

२. बँक ऑफ महाराष्ट्र, रत्नागिरी मुख्य शाखा -२०१०८५०२९९८

३. जनता सहकारी बँक लि., पुणे, रत्नागिरी मुख्य शाखा -२२०१/१२

४. इंडियन ओव्हरसीज बँक, शाखा रत्नागिरी - १९७९०१००००००३६८

५. दि सारस्वत को. ऑप. बँक लि., शाखा रत्नागिरी -२२५२००१००००२१६५

६. स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा रत्नागिरी. ४६७ १११४९२६४४७५

७. बँक ऑफ इंडिया, रत्नागिरी मुख्य शाखा -१४००१०१०००००१५४

## दि. १-०४-२०१४ ते ३१-०३-२०१५ यावर्षाचे जमा - खर्च पत्रक

| जमा | रुपये पैसे | रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| **आरंभी शिल्लक** | | **१,२७,५३,५५५-६७** | **उत्पन्न विनियोग** | | **८,२१,६४५-००** |
| हाती रोख | २३-०० | | अन्नदान निधी | ७०,३२७-०० | |
| बँकेतील बचत खात्यावरील | ६,४३,१४१-९० | | शिष्यवृत्ती निधी | ६,६९,८३१-०० | |
| बँकेतील मुदत ठेवी | १,२१,१०,३९०-७७ | | पारितोषिक निधी | ८०,७०७-०० | |
| | | | वैदिक दक्षिणा निधी | ७८०-०० | |
| **उत्पन्न विनियोग** | | **१४,६७,६४२-००** | **किरकोळ खर्च व सादिलवार** | | **३,०१,१६६-००** |
| अन्नदान निधी | १,३०,६८०-०० | | **नोकर वर्गाचा पगार** | | **६५,०००-००** |
| शिष्यवृत्ती निधी | १२,५९,६८१-०० | | **स्थावर मिळकत संबंधी खर्च** | | **५८,६०९-००** |
| पारितोषिक निधी | ७३,३८७-०० | | **ट्रस्टच्या हेतू प्रित्यर्थ झालेला खर्च** | | **५१,३३२-००** |
| वैदिक दक्षिणा निधी | ३,८९४-०० | | **प्रवास** | | **६,२९५-००** |
| | | | **डेडस्टॉक दुरुस्ती** | | **२,५००-००** |
| **गंगाजळी** | | **७१,०७६-००** | **चित्पावन महासंघ वर्गणी** | | **११,०००-००** |
| **इतर निधी** | | **४,५२,८४६-००** | **सनदी लेखापाल फी** | | **३,९३३-००** |
| **देणगी** | | **१,०१,२७९-००** | **इतर निधी** | | **१,२४,१३५-००** |
| **बँक खाती व ठेवीवरील व्याज** | | **१,०७,८२६-५९** | **वसतिगृह डिपॉझिट** | | **२,०००-००** |
| **इतर उत्पन्न** | | **३,१५,७८७-००** | **डेडस्टॉक** | | **१,३८,२५०-००** |
| **वसतिगृह डिपॉझिट** | | **१२,५००-००** | **आयकर कर कपात** | | **७,७१९-००** |
| **टेलिफोन डिपॉझिट जमा** | | **१,२००-००** | **अखेरची शिल्लक** | | **१,३७,२५,१२८-२६** |
| **मंडळ व्यवस्थापन निधीतून जमा** | | **३५,०००-००** | हाती रोख | १५-०० | |
| | | | बँकेतील बचत खात्यावरील | १,२६,२४८-७३ | |
| | | | बँकेतील मुदत ठेवी | १,३५,९८,८६४-५३ | |
| **एकूण** | | **१,५३,१८,७१२-२६** | **एकूण** | | **१,५३,१८,७१२-२६** |

**श्री. राजेंद्र विष्णू पटवर्धन**
कार्यवाह

**सीए. श्रीरंग पांडुरंग वैद्य**
कोषाध्यक्ष

तपासले. बरोबर आहे.
**फडके चव्हाण गाडगीळ ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस्, रत्नागिरी.**

## दि. १-४-२०१५ ते ३१-३-२०१६ या वर्षाचे अंदाजपत्रक

| जमा | | रक्कम | खर्च | | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | | | **स्थावर मिळकत संबंधी खर्च** | | |
| हाती रोख | १५ | | कर, विमा, प्रशासकीय खर्च | | ९८,००० |
| बँकेतील | १,३७,२५,११३ | १,३७,२५,१२८ | नोकर वर्गाचा पगार | | ७०,००० |
| | | | व्यवस्थापन व इतर खर्च | | ४,५०,००० |
| **अंदाजित जमा अनावर्ती** | | | ट्रस्टच्या हेतू प्रित्यर्थ झालेला खर्च | | १०,५०,००० |
| **देणगी** | | | डेडस्टॉक खरेदी व इतर दुरुस्ती | | १,६०,००० |
| विशिष्ट देणगी | १३,००,००० | | | | |
| सामान्य देणगी | २,००,००० | १५,००,००० | **अखेरीची शिल्लक** | | |
| | | | हाती रोख | ८७ | |
| **आवर्ती** | | | बँकेतील | १,४५,००,००० | १,४५,००,०८७ |
| बँक खाती व ठेवीवरील व्याज | | १०,९२,९५९ | | | |
| रक्कम | १,३५,९८,८६५ | | | | |
| सरासरी व्याज ८ % | १०,८७,९०९ | | | | |
| डिपॉझिट | | १०,००० | | | |
| **एकूण -** | | १,६३,२८,०८७ | **एकूण -** | | १,६३,२८,०८७ |

**श्री. राजेंद्र विष्णू पटवर्धन**
कार्यवाह

**सीए. श्रीरंग पांडुरंग वैद्य**
कोषाध्यक्ष


## ✻ कार्यालय ✻

**२७३३-ब, श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे संकुल, जोशी पाळंद, वरची आळी, सुभाष पथ,**
**रत्नागिरी-४१५ ६१२. फोन : (०२३५२) २२२०३१**

**वेळ : बुधवार ते सोमवार सकाळी १०.०० ते सायं. ६.०० वा.**

**● साप्ताहिक सुट्टी - मंगळवार ●**

**कार्यालय व्यवस्थापक : श्री. सुधाकर यशवंत वैद्य, मोबा. ९४२०९६६२८१**

**वेबसाईट - www.chitpavansanghratnagiri.org**